आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात ३३ कॅबीनेट आणि ६ राज्यमंत्र्यांचा नागपुरात शपथविधी /काही नव्या चेहऱ्यांना संधी

- पंकजा मुंडे, चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक यांचा समावेश, तर छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावीत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर यांच्यासह तेरा ज्येष्ठांना वगळलं

- राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर विरोधी पक्षाचा बहिष्कार

- एक राष्ट्र एक निवडणूक विषयी दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर होणार

**आणि**

- येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात थंडीची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

राज्यातल्या महायुती सरकारच्या मंत्रिमंजळ विस्तारात आज ३३ कॅबीनेट आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. नागपूर इथं राजभवनात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि  गोपनियतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. महायुतीच्या मागील सरकारच्या कार्यकाळातील मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावीत, रवींद्र चव्हाण, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर यांच्यासह तेरा मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आलं आहे. पंकजा मुंडे, चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, यांना यावेळी संधी मिळाली आहे.

तर नितेश राणे, प्रताप सरनाईक, योगेश कदम, माधुरी मिसाळ, इंद्रनील नाईक, मेघना बोर्डीकर, पंकज भोयर यांना पहिल्यांदाच मंत्रिमंडळात संधी मिळाली आहे.

सर्वप्रथम **भाजपाचे** चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली....

**होल्ड - बाईट - चंद्रशेखर बावनकुळे**

त्यानंतर भाजपाच्या राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक उईके, आशीष शेलार, शिवेंद्रसिंह भोसले, जयकुमार गोरे, संजय सावकारे, नितेश राणे, आकाश फुंडकर यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. **शिवसेनेच्या** गुलाबराव पाटील, दादाजी भुसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभुराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. **राष्ट्रवादी काँग्रेस**च्या हसन मुश्रिफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, अदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव पाटील, बाबासाहेब पाटील यांना राज्यपालांनी मंत्रिपदाची शपथ दिली. **राज्यमंत्री** म्हणून भाजपाच्या माधुरी मिसाळ, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर, शिवसेनेचे आशीष जयस्वाल, योगेश कदम, तसंच राष्ट्रवादी काँग्रेसच्या इंद्रनील नाईक यांनी शपथ घेतली.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपुरात सुरू होणार आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर विरोधी पक्षानं बहिष्कार घातला आहे. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची आज नागपुरात बैठक झाली, त्यात चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतल्याचं विरोधी पक्षांनी वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं. विधान परिषदेतले विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जितेंद्र आव्हाड इत्यादी नेते वेळी उपस्थित होते. परभणीमध्ये एका दलित कार्यकर्त्याचा

कोठडीमध्ये झालेला मृत्यू हा पोलीसी अत्याचाराचं प्रतिक असून बीडमध्ये सरपंचाची झालेली हत्या गृह खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे, अशी टीका या नेत्यांनी केली. यासोबतच बीडमध्ये झालेले ३२ खून हा चिंता करायला लावणारा विषय असून, या सगळ्या प्रकाराची उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधिशांमार्फत तसंच सीबीआय मार्फत चौकशी करावी, अशी मागणी नाना पटोले यांनी यावेळी केली. महायुती सरकारमधल्या घटक पक्षांनी निवडणुकीच्या काळामध्ये आश्वासने शेतकरी आणि महिलांना दिलेली आश्वासनं तातडीनं पूर्ण करावीत, विदर्भात होणारं हे अत्यंत कमी कालावधीचं अधिवेशन असून यामुळे विदर्भाला न्याय मिळणार नाही. म्हणून अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, परंपरा लक्षात घेता आघाडीच्या नेत्याला विरोधी पक्ष नेतेपद द्यावं, अशा मागण्या या नेत्यांनी केल्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २९ डिसेंबर रोजी आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमामध्ये देशातील आणि परदेशातील लोकांशी संवाद साधणार आहेत. हा या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा ११७ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिक आपले विचार आणि सूचना टोल फ्री क्रमांक 1800-11-7800 वरून पाठवू शकतात. तसेच, नरेंद्र मोदी ॲप किंवा MyGovओपन फोरमद्वारे ऑनलाइनही आपले मत सामायिक करू शकतात. येत्या भागासाठीच्या सूचना या महिन्याच्या २७ तारखेपर्यंत स्वीकारल्या जातील.

<><><><><>

महाराष्ट्राला पुढे नेणं हेच महायुतीचं ध्येय आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. नागपूरमध्ये आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या विदर्भातल्या पदाधिकारी आणि कार्यकत्यांचा मेळावा झाला, त्यावेळी ते बोलत होते. मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्यावर महामंडळाची पदं तात्काळ भरली जातील, असं ते म्हणाले.

<><><><><>

एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयकदेखील उद्या संसदेत सादर करतील. लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याविषयीच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळानं गुरुवारी मंजुरी दिली होती. प्रस्तावित संविधान संशोधन विधेयकामधे लोकसभा आणि राज्यसभा निवडणुका एकाच दिवशी करण्यासंबंधी तरतूद असेल. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उच्च स्तरीय समितीनं लोकसभा आणि राज्यसभेसाठी देशात एक राष्ट्र एक निवडणूक हा प्रस्ताव मांडला होता.

<><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवसाची सुरुवात ऑस्ट्रेलियानं कालच्या २८ धावांवरून केली. त्यानंतर ऑस्ट्रेलियान पहिले तीन बळी झटपट गमावले.

७५ धावांवर तीन गडी गमावलेले असतान स्टीव्हन स्मिथ आणि ट्रॅविस हेड यांच्या दमदार शतकी खेळीने ऑस्ट्रेलियानं तीनशे धावांचा टप्पा पार केला. स्टीव्हन स्मीथ १०१ धावा करून जसप्रीत बुमराहच्या चेंडूवर झेलबाद झाला तर ट्रॅविस हेड १५२ धावांची खेळी करून बुमराहच्याच चेंडूवर झेलबाद झाला. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक पाच गडी बाद केले. आजच्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ७ बाद ४०५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

स्त्रियांना समाजात समान स्थान मिळवून देण्याच्या उद्देशानं सुरू झालेली स्त्री मुक्ती संघटना ५०व्या वर्षात पदार्पण करत आहे. या निमित्ताने मुंबईत आज दिवसभर विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. गेल्या ५० वर्षांत

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात झालेले बदल आणि स्त्री चळवळीच्या वाटचालीचा स्त्रियांवर झालेला परिणाम या विषयावर या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिनिधींनी दोन सत्रांमध्ये आपापले विचार मांडले. स्त्रीवादी कार्यकर्त्या शारदा साठे, लता भिसे-सोनवणे, मनीषा गुप्ते, उर्मिला पवार, कुंदा प्र. नी., डॉ. विभूती पटेल यांनी या विषयातल्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकला.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमधल्या वायुगळतीच्या प्रकरणात जेएसडब्ल्यू पोर्ट लिमिटेड कंपनीच्या चौघांवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वायुगळतीचं कारण शोधण्यासाठी मुंबई किंवा पुण्यातून तज्ज्ञांना बोलावलं जाणार आहे.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय तर किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं ६ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. परभणी जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून थंडीचा जोर वाढत असून आज सर्वाधिक नीचांकी ४ पूर्णांक ६ शतांश अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागानं केली आहे. या विभागाचे प्रमुख डॉ कैलास डाखोरे यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट - डॉ कैलास डाखोरे**

**//<><><><><>//**